**रे. दी. मु. नं. ६०/२०१७**
**आनंद सावंत वगैरे विरुध्द रघुनाथ मोर्ये वर्गरे**

## निशाणी ७४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश १४ निश्म ५ प्रमाणे निशाणी ७१ येथील काढलेल्या मुद्या क्रमांक १ मध्ये दुरुस्ती करुन सुधारीत मुद्दा काढणेकरीता दाखल केला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथन असे की, वादी आपल्या दाव्यात परिच्छेद क्र. ३ मध्ये कथन केले की, ‘’ वादीच्या पूर्वाधिका-याच्या नांवे दिनांक ३१/१०/१९६७ रोजी मुंबई कुळ वहीवाट व शेत जमीन कायदा कलम ३२ (ग) अन्वये ते दावा मिळकतीचे खरेदीदार कुळ झाल्याने त्यांचे कलम ३२ म अन्वये दावा मिळकतीचे सातबारासदरी मालक भोगवटदार म्हणून त्यांच्या नावाची रितसर नोंद झालेली आहे. त्याबाबत कोणत्याही न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरील आदेश व खरेदी प्रमाणपत्र अस्तित्वात आहे. ही बाब विचारात घेता दाव्याच्या कामी नि.७१ कडील काढण्यात आलेला मुद्दा क्र. १ मध्ये खालील प्रमाणे सुधारीत मुद्दा काढणे आवश्यक आहे.

मुद्दा क्र. 1) Whether plaintiffs prove that, they are owner and in possession of suit properties, situated at Andurle, Tal-Kudal,Dist Sindhudurg ? असा मुद्दा काढण्यात आलेला आहे .

सुधारीत मुद्दा क्र. 1) Whether plaintiffs prove that, they are owner and in possession of suit properties situated at Andurle, Tal, Kudal, Dist.Sindhudurg, by ritues of order of 32 (G) proceeding and sale certificate issued u/s 32 (M) of B.T. & A.L. Act ?

या मुद्दयामध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**३.** सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ अ ते १ य यांनी निशाणी ७६ येथे म्हणणे दाखल केले व प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांच्या म्हणण्याप्रमाणे आपले म्हणणे असल्याचे नि. ७७ येथे पुरसिस दिली. त्यांना सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविलेला आहे. त्यांचे कथन असे की, मे. न्यायालयाने नि.७१ येथे काढलेले मुद्दे बरोबर आहेत. वादीचा सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो कायदयाने चालणारा नाही. वादीच्या दावा परिच्छेद क्र.१७ मधील विनंती कलम अ ) चे अवलोकन करता दावा मिळकती हया वादीच्या मालकी कब्जावहीवाटीच्या असून, वादी हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत असा याकामी हक्कस्थापनेचा ठराव होऊन मिळावा अशा प्रकारची मागणीवादीने केल्याने मे. न्यायालयाने नि.७१ कडे काढलेला मुद्दा योग्य व न्यायोचित असून त्यात दुरुस्ती करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**४.** अर्ज तसेच म्हणणे, व अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या दाव्यातील कथनांचा सुक्ष्मपणे विचार करता त्यामध्ये त्यांनी सदर दावा, दावा मिळकतीच्या मालकीबाबतची हक्कप्रस्थापना , कायम व आज्ञार्थी ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. तसेच वादीने त्यांच्या दाव्यातील कथनांच्या अनुषंगाने दावा मिळकती संदर्भात केलेल्या मागण्यांना अनुसरुन मुद्दे निश्चित केलेले आहेत. सदरील मुद्दे हे उभय पक्षातील वाद हा पूर्णपणे न्यायनिर्णीत करण्याच्या दृष्टीने पुरेसे व बरोबर आहेत. तसेच दाव्याच्या अनुषंगाने वादीने केलेल्या मागण्यांना अनुसरुन काढलेले मुद्दे हे शाबीत करण्याची जबाबदारी ही वादी यांची आहे. प्रतिवादींच्या कैफियतीमध्ये केलेली कथने व वादीच्या सदर अर्जावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे लक्षात घेता त्यांनी असे कथन केले की, वादीचा प्रस्तावित मुद्दा हा मुंबई

कुळ वहीवाट व शेतजमीन अधिनियमाच्या तरतुदीशी संबंधीत आहे. त्यामुळे सदर कायदयाच्या कलम ८५ अन्वये दिवाणी न्यायालयात निर्णय देता येणारा नाही.

**५.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०९ च्या आदेश १४ , नियम ५ प्रमाणे "*Order XIV Rule 5 of the CPC empowers the Court to amend issues or frame additional issues before passing a decree if such issues may be necessary for determining the matters in controversy between the parties.*" प्रस्तावित मुद्दा उभयपक्षातील कथनाच्या अनुषंगाने "Material proposition of fact" किंवा "Material proposition of law" असणे आवश्यक आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०९ च्या आदेश १४ , नियम १ प्रमाणे दावा मिळकतीची हक्कप्रस्थापना कायम व आज्ञार्थी ताकीद ही बाब सिद्ध होण्याच्या दृष्टीने नि.७१ कडील मुद्दा क्र. १ हा पुरेसा आहे. तसेच वादी यांनी मागणी केलेला प्रस्तावित मुद्दा हा स्पष्टीकरणात्मक स्वरुपाचा असून मुद्दा क्र. १ न्यायनिर्णीत करताना कारणमिंमासामध्ये त्याची चर्चा करता येणारी आहे.

**६.** उभय पक्षातील वाद न्याय निर्णीत करण्याच्या दृष्टीने वर नमुद मुद्दा आवश्यक वाटत नाही. वादी यांच्या दाव्यातील व प्रतिवादी यांच्या कैफीयतीमधील कथनांच्या अनुषंगाने नि.७१ येथील काढलेले मुद्दे हे उभ्य पक्षातील वाद न्यायानिर्णीत करण्याच्या दृष्टीने पुरेसे आहेत. त्यामुळे वेगळा सुधारीत मुद्दा काढण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

नि. ७४ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक: १७/ ०१/२०२४ (पी. आर. ढोरे )
कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश, कुडाळ